औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १३/०५/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०४) इतिवृत्त

मंगळवार, दिनांक १३ मे २००८ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी ४-४० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त, नगरसचिव यांचे सह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

1. श्री. अ. रशीद खान
2. श्री. संजय जोशी
3. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
4. श्री. पाटील नरवडे वसंत पांडुरंग
5. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
6. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
7. श्री. रविकांत काशिनाथ गवळी
8. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
9. श्री. नारायण तिलोकचंद कुचे
10. श्री. जावेद हसन खान
11. श्री. सिताराम सुरे

विषय क्र. 18 :

दिनांक **22/04/2008** (का.प.क्र.02) व **30/04/2008** (का.प.क्र.03) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद :

श्री.सतीश कटकटे	: दि. ३०-४-०८ च्या इतिवृत्तातील पा.क्र. २ वर रविवार आठवडी बाजार व इतर बाजार वसूली संदर्भात मुद्या मांडला होता वसुली करण्या संदर्भात आदेशीत केले अमलबजावणी केली का?
उपआयुक्त (म)	: एक महिण्यापासून मालमत्ता अधिकारी रजेवर असून शाखा अभियंता दोन दिवसापासून रजेवर आहे अर्धवट माहिती तयार झालेली आहे सविस्तर माहिती पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.
श्री.रविकांत गवळी	: २२ तारखेच्या बैठकीत ऐनवेळीचा घेतला. झेरॉक्स दिली होती.
मा.सभापती	: शासनाने उपकर लागू करण्यात संदर्भात आदेशीत केले आहे त्यासाठी पूढील तयारी म्हणून त्या संदर्भात तो प्रस्ताव होता मंजूरी दिली आहे आता दुरूस्ती असेल ती करता येईल.
श्री.अ.रशीद खान	: दुरूस्ती करता येईल ती करावी.
उपआयुक्त महसूल	: जकातऐवजी १५ महानगरपालिकेत शासनाने उपकर लागू करण्या बाबत आदेशीत केले आहे त्यासाठी काही कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. साफ्टवेअर डेव्हलप करणेसाठी टेंडर मागविले होते व्यापाऱ्यांची नोंदणी करावयाची आहे. यंत्रणेची निवडी संदर्भात आहे. वंश इन्फोटेक प्रा.लि. यांनी सर्वात कमी दराने

म्हणजे ६७५/-रू. पर युनीट प्रमाणे मान्य केले त्या संबधीचा प्रस्ताव सादर केला होता त्यास मान्यता दिली आहे.

श्री.रविकांत गवळी : हा विषय सर्वसाधारण सभेने घ्यायला पाहिजे. धोरणात्मक बाब आहे.

उपआयुक्त(म) : उपकर कधी लावायचा हे शासनाकडून आले नाही. शासनाने सर्व महापालिकेच्या आयुक्तांची १५ मे रोजी बैठक आयोजित केली आहे. नोंदणीपुरते मर्यादीत आहे.

श्री.रविकांत गवळी : शासनाकडून अद्याप काहीही आलेले नाही, टेंडर का काढले. २५०/-रू. आकारणार होते ६७५/- रू. दर ठेवू शकतो का, पॉलीसी मॅटर आहे. असे असतांना आयुक्तांनी दर निश्चित करणे बरोबर नाही. हे महानगरपालिका कर्मचारी करत नाही म्हणुन सर्वसाधारण सभेकडे जाणे आवश्यक होते.

उपआयुक्त(महसूल) : शासनाचे नोटीफिकेशन नंतर सर्वसाधारण सभेकडे हा प्रस्ताव येणारच आहे. हे डाटा फिडींगसाठी आहे. उपकराचे दर ठरविण्यासाठी सर्वसाधारण सभेकडे हा प्रस्ताव येणार आहे. ही नोंदणी फिस आहे.

श्री.रविकांत गवळी : सर्वेक्षणाची फीस आहे. व्यापारी येतील. रू.६७०/- घेणार आहोत. महानगरपालिका कर्मचारी ठरवू शकतो किंवा नाही, हे ठरवू.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :जकात रद्द झाल्यानंतर उपकर लावण्या संदर्भात अगोदरच कार्यपध्दती निश्चित व तयारी म्हणून त्यासाठी प्रस्ताव आहे सर्वसाधारण सभेसमोर आल्यानंतर योग्य तो निर्णय ते सभागृह घेणारच आहे.

श्री.रविकांत गवळी :उपकर लावणार हे सर्वांना माहित आहे. एजन्सी ठरविली मान्य आहे. परंतू २५०/- रू पर्यंत लावणार असे म्हटले होते ६७५/- रू. कुणीही देणार नाही व्यापा-यांची दिशाभूल करतो आहे. माझे माहिती प्रमाणे हे टेंडर चुकीचे पध्दतीने काढले आहे सर्वसाधारण सभेचा अधिकार आहे. नंतर यायला पाहिजे.

उपआयुक्त(महसूल) : व्यापाऱ्यांकडून उपकर किती प्रमाणात आकारणी करायचा हे पॉलीसी मॅटर असून योग्य त्या निर्णयासाठी सर्वसाधारण सभेपूढे येईल ६७५/-रू. हे नोंदणीसाठी घेणार आहे. कोणाकडून किती घ्यावयाचे आहे हे ठरवावयाचे आहे. व्यापारी किती व महानगरपालिका किती ४ महिन्यात ठरवावयाचे आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : उपकर लावण्यासाठी कार्यपध्दती संबधी आहे सजेस्ट करावे काय दुरूस्ती करायची ती सर्वसाधारण सभेपूढे आल्यानंतर करता येईल.

श्री.रविकांत गवळी : प्रत्येक व्यापाऱ्यांना २५०/-रू. आकारणी करणार असे आयुक्तांनी यापूर्वी जाहीर केले होते. सर्व फॉर्म भरून ६७०/- घेणार. ४५०/- भुर्दंड कोणी भरायचा.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेपूढे हे येणारच आहे त्यावेळी योग्य त्या सूचना देवून निर्णय घेता येईल. इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

ठराव :

दिनांक **22/04/2008** व **30/04/2008** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

विषय क्र. 19 : (दि.31.3.2008 च्या स्था.स. सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.488)

दिनांक 5-2-2008 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. 326 मधील मुद्दा क्र.5, 8, 9, 10 व 11 हा स्थगित ठेवण्यात आला होता. सदरील मुद्दे हे महानगरपालिकेचया मालकीचे विविध ठिकाणी असणारे व्यापारी संकुलातील दुकाने, हॉल भाड्याने देण्यासाठी भाडे दर निश्चिती करणे आवश्यक आहे. सविस्तर इमारत व स्थळा नुसार सिध्द शिघ्र गणकाचे दर सन 2007 नुसार मुल्यांकन करून भाडे समितीने दर निश्चित कले आहेत. सदरील दर हे मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करीत आहे.

1. न.भु.क्र.15302/12 मौजे गारखेडा येथील नुपूर अपार्टमेंट जवळील महानगरपालिकेच्या मालकीचे व्यापारी संकुलातील तळमजल्यावरील 09 दुकाने व व्यावसायिक हॉल भाडेतत्वावर देण्यासाठी एकूण रू.76/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारणे योग्य.
2. न.भु.क्र.19381/8, 19381/8/1/अ, मौजे बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व्यापारी संकुलातील तळमजल्यावरील दुकाने व व्यावसायिक हॉलसाठी रू.200/-, पहिल्या मजल्यावरील दुकानांसाठी रू.225/- व दुसऱ्या मजल्यावरील दुकानांसाठी रू.150/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारणे योग्य.
3. न.भु.क्र.19149 रेल्वे स्टेशन संत गाडगे महाराज व्यापारी संकुलातील दुकान क्र.1 च्या बाजुला असलेले दुकानाचे क्षेत्रफळ 7.50 चौ.मी. असून रू.100/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारणे योग्य.
4. न.भु.क्र.800 मौजे चिकलठाणा येथील महानगरपालिकेची झोन कार्यालयाची जुनी इमारत मधील पहिला मजला ज्याचे क्षेत्रफळ 174.08 चौ.मी. अध्यक्ष, संत भगवानबाबा शिक्षण प्रसारक मंडळ यांना रू.48/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडेतत्वावर देणे योग्य.
5. न.भु.क्र. 15297/पी मौजे छत्रपतीनगर गारखेडा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे सांस्कृतिक सभागृह ज्याचे क्षेत्रफळ 105.82 चौ.मी. अध्यक्ष, छत्रपती नगर सामाजिक संस्था, औरंगाबाद यांना रू.64/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडेतत्वावर देणे योग्य.

वरील जागासाठी येणाऱ्या मासिक भाड्याच्या 12 पट अनामत रक्कम म्हणुन आकारणे योग्य. तसेच नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, विद्युत कर जो येईल तो संबंधीतास दुकान/हॉलच्या भाड्याच्या व्यतिरिक्त व सेवा शुल्क रक्कम रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरणा करावा लागेल.

करीता सुधारीत प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.सतीश कटकटे : संबधीत अधिकारी उपस्थित नाही. पूढील बैठकीत माहिती घेवून यावर निर्णय घ्यावा.

श्री. वसंत नरवडे : टेंडर काढून कार्यवाही केली क्र. १ वर गारखेडा येथील रेट चांगले आले परंतू काही बाबतीत कमी आहे. क्र.४ मध्ये कमी आहे कमेटीने रेट कशाच्या अधारे निश्चित केले.

श्री.रविकांत गवळी : १,२,३ चे दर फिक्सींग साठी आलेले आहे. ४,५ च्या संदर्भात टेंडर काढावे. स्पर्धा होईल.

श्री.संजय जोशी : प्रस्तावातील अ.क्र.१,२,३ मंजूर करावे चार पाच मध्ये असे दिले की संस्थेला दयावे असे बंधनकारक नाही. त्यासाठी टेंडर करावे जास्त रेट येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : क्र. ४,५ चे टेंडर मागवावे उर्वरीत मंजूर करावे.संस्थेचे नाव टाकून प्रस्ताव दिला तसा येवू नये.

मा. सभापती : अ.क्र.1 ते 3 ला मंजुरी देण्यात येते. अ.क्र.4 व 5 साठी फेरनिविदा काढण्यात याव्यात. विना निविदा कोणत्याही संस्थेचे नांव घालून प्रस्ताव सादर करू नये.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.1 ते 3 मध्ये दर्शविलेले मनपा मालकीचे हॉल, दुकाने भाड्याने देण्यासाठी दर निश्चिती करण्यास आणि या जागासाठी येणाऱ्या मासिक भाड्याच्या 12 पट अनामत रक्कम म्हणुन आकारणे तसेच नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, विद्युत कर जो येईल तो संबंधीतास दुकान/हॉलच्या भाड्याच्या व्यतिरिक्त व सेवा शुल्क रक्कम रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरणा करावा लागेल या अटीवर मंजुरी देण्यात येते.

1. न.भु.क्र.15302/12 मौजे गारखेडा येथील नुपूर अपार्टमेंट जवळील महानगरपालिकेच्या मालकीचे व्यापारी संकुलातील तळमजल्यावरील 09 दुकाने व व्यावसायिक हॉल भाडेतत्वावर देण्यासाठी एकूण रू.76/- प्रती चौ.मी. प्रती माह आाकारणेस मंजुरी देण्यात येते.

2. न.भु.क्र.19381/8, 19381/8/1/अ, मौजे बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व्यापारी संकुलातील तळमजल्यावरील दुकाने व व्यावसायिक हॉलसाठी रू.200/-, पहिल्या मजल्यावरील दुकानांसाठी रू.225/- व दुसऱ्या मजल्यावरील दुकानांसाठी रू.150/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारण्यास मंजुरी देण्यात येते.

न.भु.क्र.19149 रेल्वे स्टेशन संत गाडगे महाराज व्यापारी संकुलातील दुकान क्र.1 च्या बाजुला असलेले दुकानाचे क्षेत्रफळ 7.50 चौ.मी. असून रू.100/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारण्यास मंजुरी देण्यात येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अ.क्र.4 व 5 साठी फेरनिविदा काढण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 20 : (दि.31.3.2008 च्या स्था.स. सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.489)

दिनांक 5-2-2008 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.326 मधील मुद्दा क्र. 1 हा स्थगित ठेवण्यात आला होता. त्याबाबत सविस्तर प्रस्ताव ठेवणेसाठी सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार रस्ता रूंदीकरणाबाबत नगर रचना विभागाचा अभिप्राय घेवून खालील प्रमाणे फेर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1. महानगरपालिका हद्दीतील विविध भागातील अतिक्रमण विभागातील काढण्यात आलेल्या टपरी धारकांना जागा देण्यासाठी एकनाथनगर भागात फुलेनगर टी पॉइंट ते वेदांतनगरकडे जाणाऱ्या 24 मीटर रस्त्यालगत व शासकीय तंत्रनिकेतन वस्तीगृहाच्या कुंपण भिंतीलगत स्टॉल धारकांस 2.4 x 2.7 मीटर म्हणजेच 6.48 चौ.मी. क्षेत्राची जागा भाड्याने द्यावयाची झाल्यास सन 2007 च्या सिध्द शिघ्र गणकानुसार रू.70/- प्रती चौ.मी. दर आकारण्यात येईल. तरी या दरास मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच सदर जागा देताना एक वर्षाचे भाडे आगाऊ भरणा करून घेणे व अनामत

रक्कम रू.1000/- प्रती चौ.मी. आकारण्यात येईल. नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर भाड्या व्यतिरिक्त भरावा लागेल, शिवाय सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरावा लागेल.

2. दिनांक 5-2-2008 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.326 मधील मुद्दा क्र.2, 3 व 4 हे महानगरपालिकेने शाळेसाठी खाजगी व्यक्तीकडून जागा भाड्याने घेण्याबाबतचे आहे. त्याचे भाडे ठरविण्यासाठीचे भाडे दर निश्चितीसाठी मा.स्थायी समिती समोर सदर प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

01. मोहल्ला विठ्ठलनगर येथील खाजगी व्यक्ती श्री. अण्णासाहेब दौलतराव राऊत यांच्या मालकीच्या दोन खोल्या भाड्याने घेतल्या आहेत. सदरील दोन खोल्यांचे भाडे खालील प्रमाणे दर्शविण्यात येते.

अ) खोलीचे लोडबेरींग मध्ये असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफह 18.88 चौ.मी. असून रू.47/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे संबंधीतास देणे योग्य राहील.

ब) खोलीचे आर.सी.सी. कॉलममध्ये असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफळ 9.45 चौ.मी. व खोलीचे चटई क्षेत्र 7.87 चौ.मी. असून रू.66/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे एवढे येते.

02. मोहल्ला बेगमपुरा येथील खाजगी व्यक्ती श्री.अलीम खान यासिन खान यांचेकडून महानगरपालिकेच्या शाळेसाठी खोल्या भाडेतत्वावर घेणेसाठी रक्कम रू.39/- प्रती चौ.मी. प्रती माह संबंधीतास देणे योग्य राहील.

03. मौजे पडेगांव येथील खाजगी व्यक्ती श्रीनंद छोटीराम वाणी यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेसाठी भाडेतत्वावर घेणेसाठी रक्कम रू.53/- प्रती चौ.मी. प्रती माह भाडे देणे योग्य राहील.

पाणीपट्टी व मालमत्ता कर संबंधीत मालकास भरावा लागेल व विद्युत देयक महानगरपालिका भरेल. तरी वरील भाडे दर प्रती माह प्रति चौ.मी. आकारणे योग्य.

करीता सुधारीत प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

<u>संवाद :</u>

श्री.अ.रशिद खान : २४ मी. रस्त्यावर टपरी देत आहोत मा. उच्च न्यायालयाचे ४० मीटर रस्त्याच्यापर्यंत टपरी देवू नये असे आदेश असतांना हा प्रस्ताव कसा आलेला आहे कुणी सादर केला. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होतो. मेडीकल कॉलेजच्या रस्त्यावर रस्ता सोडून दहा फुटाच्या नंतर टपरी होती त्याही हटविल्या हे योग्य नाही मा. न्यायालयाचे आदेश काय आहेत माहिती द्यावी.

श्री.सतीश कटकटे : मा. न्यायालयाचे निर्देश काय आहे. २४ मी. रस्त्यावर टपरी देवू शकतो का?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : शहरात एकूण टपऱ्या किती अधिकृत /अनाधिकृत किती यापूर्वी काढलेल्या टपरीधारकांना जागा दिली का नवीन टपऱ्या टाकण्याचा प्रश्न येत नाही. जे रस्ते अरूंद झाले ते ते मोठे करण्यासाठी प्रयत्न करतो सर्व माहिती घेवून पूढील सभेत द्यावी.

श्री.संजय जोशी : किती फुट रूंद रस्ता आहे रस्त्याची आजची परीस्थिती काय याची माहिती नगररचना विभागाकडून मिळाली नाही. एक वर्षापासून सहा.संचालक नगररचना अधिकारी या महापालिकेला नाही. वारवांर मागणी करतो प्रशासन दखल घेत नाही. सभागृहाने मा. मुख्यमंत्री यांना विनंती करून एक महिण्यात सहा.संचालक नगर रचना पदावरील अधिकारी मागवावे.

मा.सभापती : ज्यांचेकडे चार्ज आहे त्यांनी विना परवानगी गैहजर राहायला नको यासाठी सर्वांच्या सहकार्याने शासनाकडे कायमस्वरूपी अधिकारी द्यावे म्हणून शासनाकडे प्रयत्न केले जातील.

श्री.अ.रशीद खान : स्थायी समितीने निर्णय घ्यावा, शासनाकडे मागणी करावी.

श्री.संजय जोशी : ज्यांचेकडे चार्ज आहे ते हजर राहत नसतील तर महापालिकेच्या अधिकाऱ्याकडे चार्ज द्यावा.

मा.सभापती : चार्ज देणे ही जरूरी आहे. जे सिनियर आहे त्यांना चार्ज देण्याबाबत विचार करावा.ज्यांचेकडे चार्ज आहे त्यांनी परवानगी का घेतली नाही.

उपआयुक्त(म.) : आजच्या बैठकीला विना परवानगी गैरहजर असल्याने त्यांचा खुलासा घेण्यात येईल. पूढील बैठकीत त्यांनी हजर राहावे यासाठी आदेशीत करण्यात येईल.

श्री.अ.रशीद खान : तात्पुरता चार्ज सक्षम अधिकाऱ्याकडे देण्याची शासनाला मागणी करावी.

श्री.जावेद हसनखान : महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार द्यावा.

मा.सभापती : सहा.संचालक नगररचना हे नेहमीच सभेला गैरहजर असतात त्यामूळे नागरीकांची कामे होत नाही शासनाकडून अधिकारी येइपर्यंत या पदाचा तात्पुरता चार्ज महापालिकेच्या तीन कार्यकारी अभियंता यांचे पैकी उपआयुक्त महसूल यांनी मा. आयुक्त यांचेशी चर्चा करून चार्ज देण्यात यावा व सभेला गैरहजर राहणार नाही याची यापूढे दखल घ्यावी.

श्री.अ.रशिद खान : टपरी व्यतिरिक्त शाळाही किरायाने घेणे संबधी दिले त्याची माहिती देणेसाठी अधिकारी नाही श्री.कालेले नसतील तर त्यांचे सहाय्यक असतील त्यांचेकडून खुलासा घ्यावा. तसेच श्री.कालेले नंतर जबाबदार कोण आहे?

उप आयुक्त(म.) : संचिका सादर केलेली आहे. चार्ज देण्यात येईल.

मा. सभापती : विषय क्रमांक २० स्थगित करण्यात येतो.

ठराव :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 21 :

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद ह्यांनी ए.एम.सी. टॅक्सी कॅब बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक 1132 दिनांक 29.9.2007 नुसार औरंगाबाद शहरातील नागरीकांच्या व शहरास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या तसेच विविध व्यवसायातील नागरिकांच्या सुविधेसाठी तसेच दारिद्र्य रेषेखालील D.W.C.U.A. (Development of Women & Children in Urban Areas) यांना रोजगार मिळवुन देण्याच्या उद्देशाने औरंगाबाद महानगरपालिका हा उपक्रम राबविणार आहे. टॅक्सीचे दर मा. विभागीय आयुक्त तथा आर.टी.ए. औरंगाबाद ह्यांनी निश्चित केल्याप्रमाणे लागु केले जातील.

सदर प्रकल्पासाठी मा.आयुक्त ह्यांनी मारूती कंपनीच्या Versa Model ची शिफारस केलेली असुन ती सर्व 25 महिला व बालविकास बचत ग्रुप्स ना मान्य आहे. प्रकल्प अधिकारी ह्यांनी शिफारस केलेल्या 25 महिला बचत ग्रुपनी पण ह्या वाहनास टॅक्सी करीता विकत घेण्यासाठी होकार दर्शविला आहे.

टॅक्सीज विकत घेण्यासाठी प्रत्येक बचत ग्रुप बँक लोन घेणार असुन वाहने बचत ग्रुपच्या नांवावर रजिस्टर होणार आहेत. प्रत्येक टॅक्सीवर 2 अनुभवी वाहन चालकांची नेमणुक बचत ग्रुपने करणे बंधनकारक आहे. प्रत्येक टॅक्सीसाठी खालील प्रमाणे व्यवस्था राहील.

1. दिवस व रात्र असे दोन पाळ्यांमध्ये टॅक्सी सेवा चालू राहील. टॅक्सीला धंदा मिळवुन देण्यासाठी कॉल सेंटरची नेमणुक करण्यात येईल.
2. प्रत्येक टॅक्सीवर इलेक्ट्रीक टॅक्सी मिटर बसविण्यात येईल.
3. प्रत्येक टॅक्सीवर Global positioning system (GPRS) सिस्टीम राहील. ज्या मध्ये Vehicle Mounted Unit (V.M.U.) बसविले जाईल. ज्या द्वारे टॅक्सीज कोठे आहे हे इंटरनेटद्वारे कॉम्प्युटरवर दिसेल.

4. प्रत्येक वाहनचालकांकडे मोबाईल फोन असेल जेणे करून कॉल सेंटरशी वाहनचालकाचा संपर्क राहील. मे.मनिषा इन्फोकॉम सर्व्हीसेस, चिकलठाणा, औरंगाबाद ह्यांची Call Center म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना रूपये 836 + 12.3% Service Charge प्रति महिना/प्रति टॅक्सी अदा करावा लागेल. Call Center हे टॅक्सी चालकांना धंदा मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करतील व सतत टॅक्सीवाल्यांच्या संपर्कात राहतील. तसेच अडचण आल्यास मनपा कार्यालयाच्या संपर्कात राहतील व महिला बचतग्रुप सदस्यांना सहकार्य करतील.
5. सदरील टॅक्सी बाहेरगावी पण नेता येईल. त्या करीता किलोमिटर व तास आर.टी.ए. औरंगाबाद ह्यांनी निश्चित केल्या प्रमाणे दर राहतील.

खालील दर्शविल्या प्रमाणे टॅक्सी चालविण्यासाठी लागणारा पूर्ण खर्च बचत ग्रुपला करावा लागेल.

1. दोन वाहनचालकांचा पगार, भत्ते, ड्रेस इत्यादी.
2. पेट्रोल, ऑईल, ग्रीस खरेदी खर्च.
3. टॅक्सी मिटर नवीन बसविणे व त्याची दुरूस्ती व देखभाल.
4. व्हेईकल ट्रॅकींग युनिट नवीन बसविणे व त्याची दुरूस्ती व देखभाल.
5. वाहनास लागणाऱ्या ॲक्सेसरीज, टूल्स, इंटेरियर, कुशन, डीव्हीडीचा खर्च.
6. आर.टी.ओ. टॅक्सेस, इंन्शुरन्स चार्जेस.
7. जी.पी.आर.एस. सिस्टीम चालविण्यासाठीचा येणारा वार्षिक खर्च.

6. प्रोजेक्ट डिपार्टमेंट तर्फे सेंट्रल गव्हर्नमेंट कडुन प्राप्त झालेली सबसिडी प्रति टॅक्सी रूपये 1 लाख 25 हजार ही बचत ग्रुपच्या खात्यावर वाहन खरेदी व इतर ॲक्सेसरीजसाठी त्यांचे खात्यावर जमा करण्यात येईल. बचत ग्रुप प्रत्येकी रूपये 25 हजार जमा करतील. उर्वरीत लागणाऱ्या रकमेसाठी विविध बँका तर्फे बचत ग्रुप कर्ज घेईल. महानगरपालिका स्वत: टॅक्सी साठी काहीही खर्च करणार नाही व टॅक्सीज ह्या बचत ग्रुपच्या नावाने राहतील. त्याची देखभाल/दुरूस्ती करणे, सांभाळण्याची जबाबदारी बचतग्रुपची राहील. प्रशासकीय दृष्ट्या ह्या कामावर प्रकल्प विभागाचे नियंत्रण राहील व तांत्रिक दृष्ट्या यांत्रिकी विभागाचे नियंत्रण राहील. नियमित धंदा मिळवुन देण्यासाठी नेमलेल्या कॉल सेंटरचे नियंत्रण राहील.
7. प्रत्येक टॅक्सी धारकास महानगरपालिकेत नेमलेल्या कर्मचाऱ्याकडे 100/- प्रति दिन भरावे लागतील. प्रत्येक महिन्याला रक्कम रूपये 3000/- भरावी लागेल. 25 टॅक्सीज पासुन महिन्याला रूपये 75,000/- व वर्षाला रूपये 9 लाख रक्कम मनपाकडे जमा होतील.

रूपये 3000/- चा खर्च महानगरपालिका खालील प्रमाणे करेल (प्रतिमाह प्रति टॅक्सी)

1)	For Call Center Charges	: Rs. 942.00
2)	GPRS System service Charges	: Rs. 500.00
3)	Mobile phone to every driver(Tow driverper taxi)	: Rs. 550.00
4)	Payment of one Computer operator/Computer/ Mobile stationery/for Accounting work & work Of Mahila Group/Per taxi/per month.	: Rs. 450.00
		: Rs.2542.00
5)	Remaining amount will be deposited in AMC Taxi amount & will be utilized for wellfair of Taxi drivers or for purpose of LPG in future.	: Rs. 458.00
	Total Rs.	**: 3000.00**

अशा प्रकारे टॅक्सी द्वारे प्रति वर्षी येणाऱ्या रूपये 9 लाखाच्या उत्पन्नातुन मनपा टॅक्सी प्रोजेक्टसाठीच खर्च करेल. बँकेचा हप्ता नियमितपणे भरण्याची जबाबदारी बचत ग्रुपची राहील.

सदरील प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

संवाद :

श्री.अ.रशीद खान : दोन वाहनचालक ठेवत आहे एक ३०००रू पगार घेईल ड्रेस, भत्ता, पगार, गाडी देणार महापालिकेला परवडणारे आहे का? खुलासा घ्यावा.

श्री.संजय जोशी : या ठरावात बचत गटांना व्हर्सा मारूतीचे मॉडेलची वाहन हे टॅक्सी म्हणून देण्याचे प्रशासनाने ठरवले याचा अर्थ बचत गटाना बरबाद करण्याचे ठरवले ही गाडी पेट्रोलवर असून एक लिटरला १० कि.मी. चालते. ५२ रू लिटर पेट्रोल आहे. ५ लक्षची गाडी घेतल्यानंतर यास दोन वाहनचालक असणार १०० रू. प्रत्येक दिवशी महापालिकेला देणार, १ कि.मी. ५-२० खर्च या गाडीला येणार आहे. प्रशासनाने प्रत्येक बाबतीत पीएमसी नेमले या बध्दल प्रोजेक्ट रिपोर्ट प्रशासनाने केला काय? ही टॅक्सी देण्याचे ठरविले तर शहरात अनेक स्टार हॉटेलमध्ये स्वतःचे कॉउंटर असून किंबहुना टॅक्सीसाठी ते भाडेने दिले आहे. ते सोडून या टॅक्सीला व्यवसाय मिळेल का याचा विचार होणे गरजचे आहे. यात व्यावसायीक स्थानिक नागरी पर्यटक असे दिले स्थानिक नागरीक यांना मीटरच्या रिक्षाने जाणे परवडत नाही म्हणून ॲपेरिक्षाने ५ रूपये देऊन जातात. म्हणजे २५ महिला बचत गटास सुधारणा करणार की त्यांना तोटयात आणणार आहे. ५ लक्ष कर्ज घेवून एक पैसाही परत फेड महापालिका करणार नाही हे सर्वसाधारण सभेत मी चर्चा केली होती. महिंद्रा किंवा इतर वाहन दिले असते तर त्यांचा उदरनिर्वाह झाला असता किंवा त्या बचत गटाचे मालकीची एक टॅक्सी फ्रि झाली असती. ही गाडी घेण्यासाठी रिपोर्ट तयार केला का ही गाडी घेणे फिजीबल होते का आजही शहरात ४-५ रू. प्रमाणे इंडिका व इतर गाडया मिळतात या गाडीचा कि.मी. मागे जास्त खर्च येतो ही गाडी भाडेने कूणी घेईल का, याचा खूलासा करावा.

उपअभियंता (तांत्रिक) : प्रोजेक्ट तयार केला तेंव्हा इस्टीम गाडीची निवड केली होती. ही गाडी कंपनीने बंद केल्यामूळे पर्याय म्हणून मारूती कपंनीची व्हर्सा मॉडेल निवडण्यात आली या गाडीची कॅपॅसीटी ४ अधिक १ सीटची आहे. ही पेट्रोल गाडी असून यासाठी सेन्ट्रल गव्हरमेंन्टकडून सबसिडी १.२५ लक्ष आहे. बचत गटात २५ हजार त्यांचे खात्यामध्ये जमा करतील असे दीड लक्ष भरणा केल्यानंतर उर्वरीत रक्कम ही बॉकेतून कर्ज घेवून ती गाडी खरेदी करावी लागणार आहे.१ मे रोजी तीन गाडया आलेल्या आहे.

श्री.संजय जोशी : ही टॅक्सी बचत गटांना वापरणे फिजीबल आहे का?बचत गटांनी सुध्दा हा प्रोजेक्ट फिजीबल असेल तर करावा. बचत गटांनी १००/-रू. दिले नाही तर पूढे काय?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : १ तारखेला तीन गाडया दिल्या गेल्या १५ दिवसात काय परीस्थिती आहे खूलसा करावा.

उपअभियंता(यांत्रिकी) : गाडयाचे आरटीओ रजिस्ट्रेशन होणे बाकी आहे. परवापर्यत होईल त्या टॅक्सीला महाराष्ट्र टॅक्सी परमीट मिळणार असून या परमीटमध्ये गाडीमध्ये मीटर बसविणे कंम्पलसरी नाही १० रू. प्रती कि.मी. प्रमाणे दर राहतील.

श्री.संजय जोशी : अतिशय शोकांतिका आहे. जीपीआरएसचा सविस्तर अर्थ(लॉंग फॉर्म) माहित आहे का?

उपअभियंता (या.) : ग्लोबल पोजीशनींग सिस्टीम.

श्री.संजय जोशी : चुकीची माहिती देवू नये. ज्यांना माहित असेल त्यांनी उत्तर द्यावे.

उपआयुक्त महसूल : जीओमेट्रीक पोजीशन सेन्सर रिमोंट सिस्टीम असे असेल.

श्री.संजय जोशी : जनरल पॉकेट रेडीओ सिस्टीम असा लॉगफॉर्म होतो. बरोबर आहे का. सभागृहात चूकीचे प्रस्ताव यापूढे सादर करू नये. बचत गटांना बरबाद करतो. त्यासाठी व्हर्सा कंपनीची गाडी न घेता त्या बचत गटांना खरोखरच उदरनिवार्ह करता येईल अशी

वाहन द्यावे. शहरातील एक ही व्यक्ती १० रू कि. मी., ए.सी. टॅक्सीने जाणार नाही. येणारे पर्यटक हे रस्त्यांवर रिक्षाच्या ठिकाणी थांबणार नाही. येतांना ते पॅकेज ठरवून येतात. उतरल्याबरोबर बोर्ड घेवून टॅक्सीसह वाहनचालक हजर असतो. हे प्रपोजल प्रशासनाने स्वत:चे सीआर चांगले करण्यासाठी ठेवले असेल तर चूकीचे आहे बचत गटांना बरबाद करण्याचा हा प्रयत्न आहे. हे थांबवावे. स्थगित करावे.

श्री.अ.रशीद खान : ऑल इंडिया परमीट का घेत नाही. शहरात एसी गाडी ७ रू कि.मी. प्रमाणे अनेक टॅक्सी मिळतात ही गाडी कुणी घेईल का याचाही विचार केला पाहिजे.मारूती कंपनी कार देणार दोन वाहनचालक कशासाठी ट्रक गाडीवर लागतात

उपअभियंता (यांत्रिकी) : दोन शिप्टमध्ये २४ तास गाडी चालणार आहे.

श्री.संजय जोशी : ८ हजार वाहनचालकास १०० रू महापालिकेला दैनिक रक्कम देणार एवढा खर्च झाल्यानंतर त्या बचत गटास गाडी चालविणे परवडणारे आहे का?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : थोडक्यात हे फिजीबल नाही फाईव स्टार बचत गट असेल तो अशी महागडी टॅक्सी घेवू शकतो.

श्री.संजय जोशी : फाईस्टार बचत गटास शासनाचे अनुदान मिळत नाही.

श्री.अ.रशीद खान : पदाधिकारी अधिकारी यांचे वाहनही २४ तास चालते त्यांना दोन वाहनचालक का नाही.

उपअभियंता (यांत्रिकी) : महाराष्ट्रात पहिला प्रोजेक्ट आहे.सक्सेस करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.तीन टॅक्सी घेतल्या आहे.

श्री.संजय जोशी : प्रोजेक्टच्या विरोधात नाही बचत गटास फायदयाचे होणार नाही गरीब लोकांना कर्जाच्या खायीत लोटणार असे चित्र दिसते.म्हणून विरोध आहे.फिजीबल बघावे पीएमसी नेमण्यास हरकत नव्हती ते का केले नाही.हे रद्द करावे.टॅक्सी घेतांना सभागृहाच्या निदर्शनास का आणून दिले नाही. प्रशासनाने मनमानी करावे हे बरोबर नसून सदस्य सुध्दा नागरीकांच्या साठी मागदर्शनपर बोलले हे जनतेला कळू दया. हे रद्द करण्याची इच्छा सभागृहाची नाही परंतू बचत गटांना परवडेल अशा गाडया द्याव्यात.

श्री.वसंत नरवडे : बचत गटाच्या अध्यक्षा व सेक्रेटरी यांना तीन गाडया आणल्याची माहिती दिली का या गाडयाचे रजिस्टेशन केले नसेल तर त्या घेवू नये. शहरात ६रू प्रमाणे एसी गाडी मिळते् १०रू प्रमाणे ही गाडी मिळत असेल तर बचत गटाचा व्यवसाय चालेल का याचा ही विचार केला पाहिजे. निवड कुणी केली त्यातील त्यांना काय माहिती आहे तीनही गाडया परत कराव्या ज्यांना देणार ते बचतगट बरबाद होतील. या बचत गटांना ओरीजनल मार्केट रेट समजले पाहिजे तोपर्यत स्थगित करून पुन्हा प्रस्तावित करावे. महिलाना प्राधान्य यासाठी देतो की त्यांची उन्नती व त्यांचे हातून हा कारभार चालावा. बचत गटांना प्रशिक्षण द्यावे ६ रू.च्या आतमध्ये चालविणारे असेल तर त्यांना द्यावे. ठरावास विरोध नाही, गाड्या रद्द करा. स्पर्धा आहे. व्यवसाय चालणार नाही. कर्जाचा हप्ता, व्याज व इतर सर्व माहिती त्यांना द्यावी.

श्री.रविकांत गवळी : बचत गटासाठी विषय नसून कॉल सेंन्टर महापालिकेने परहेड एक दिवसाला १००० रू देण्याचा प्रस्ताव आहे बचत गटास फायदा होईल न होईल ते महापालिकेला पैसे भरतील न भरती त्याशी घेणेदेणे नाही नुसती मंजूरी घ्यायची व महापालिकेचे नुकसान करण्याचा हा प्रस्ताव बचत गटांना परवडेल अशा दृष्टीने दुरूस्तीसह प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत करावे.

श्री.वसंत नरवडे : गाडयाचे रजिस्टेशन रद्द करावे खरेदी करू नये.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : बचत गटांना दिल्या जाणार महापालिकेकडे त्यांनी रक्कम भरणा करतील न करतील परंतू कॉलसेन्टरकडे महापालिकेला रक्कम द्यावी लागणार असा हा प्रस्ताव आहे. हे बरोबर नाही.

अति.शहर अभियंता : टॅक्सी घेण्याचा हा धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला होता.कॉलसेंन्टरवरून त्या बचत गटास व्यवसाय मिळणार आहे.

श्री.संजय जोशी : टॅक्सी दिली कॉलसेंन्टरवरून चालविली नाही १००रू दिले नाही तर पुढे काय? सर्वसाधारण सभेत मी विरोध केला होता.टॅक्सीचा व्यवसाय हा उदरनिवार्ह चालविण्यासाठी होवू शकत नाही जेमतेम एक कुटूंब चालू शकते ज्यांचेकडे ८-१० गाडया आहे त्यांचे ठिक आहे कर्जाचा विचार केल्यास हा प्रोजेक्टस फिजीबल नाही.

अति.शहर अभि. : जीपीआरएस सिस्टीम त्यासाठीच बसविली आहे कॉल सेन्टरवर त्या बाबतीत संपूर्ण माहिती असणार आहे.टॅक्सी धारक गटास पैसे भरणा करणे भाग आहे.

श्री.संजय जोशी : यानंतरचा ठराव गोलमोल आहे.कॉलसेंन्टर व जीपीआरएस हे दोन्ही एकत्र करून शेवटी दिले की ,सदर कंपनीचे दर कमी असल्याने मंजूरी दयावी व त्यांचेशी वार्षिक करार करण्यात येईल मंजूरी दयावी एकदा वार्षिक करार केल्यानंतर बचत गटांनी पैसे दिले नाही तर कॉल सेन्टरला पैसे देण्याची जबाबदारी कुणाची असणार आहे.वार्षिक करार कंपनी कुणाशी करणार आहे

अति.शहर अभियंता : वार्षिक करार कंपनी बचतगटाशी करणार.

श्री.संजय जोशी : असे असेल तर मंजूरी सभागृहाची कशाला पाहिजे.

अति.शहर अभियंता : महापालिकेच्या ज्या ज्या अत्यावश्यक सेवा आहे त्या वाहनावरही बसविणार आहोत.

श्री.संजय जोशी : महापालिकेच्या वाहनावरही बसविणार हा विषय का घुसडला. एक-एक मोबाईल द्या. पडेगांवपर्यत टँकर चालले दिसणार परत बोलविण्याची एवढी गरज पडणार का? जेटींग मशीनवर कुणाले लक्ष नसते नगरसेवकांना दररोज फेस करावे लागते. जीपीआरएस हे टॅक्सीच्या नावाखाली रेडी करणार टॅकरवर, जेटींगवर बसविणार महापालिकेला भुर्दंड होणार.

श्री.रविकांत गवळी : प्रत्येक वार्डासाठी एक घेवून दिले. कचरा वगैर हाताळण्यासाठी खाजगीकरण केले हे केल्यानंतर महापालिकेच्या वाहने कशासाठी लागणार आहे.

श्री.संजय जोशी : जीपीआरएस सीस्टीम अत्यावश्यक सेवा जे अग्निशमन विभागासाठी आहे. आग चिकलठाण्यात, गाडी वाळूजला गेली असे होत नाही. अधिकाऱ्यांचे सीआर चांगले करण्यासाठी प्रस्ताव येत असेल तर योग्य नाही.

अति.शहर अभियंता : जीपीआरएसचा फायदा सभागृहाने लक्षात घ्यावा.

श्री. अ.रशिद खान : सर्वसाधारण सभेत मंजूर केले गाडीचे नाव दिले नाही डिझेलची गाडी का खरेदी केली नाही.

श्री.संजय जोशी : सर्वसाधारण सभेने टॅक्सीला मंजूरी दिली आहे. एवढी काळजी वाटते फायरचे, जेटींगच्या वाहनचालकास ग्रुपमध्ये फ्रि आहे कमी खर्चात काम होते. या शहराला आम्ही जागतिककरणात ,कॉम्प्युटराईजेशनमध्ये किती पूढे आहे हे दाखवण्यासाठी करीत असेल तर योग्य नाही अगोदर वसुलीकडे प्रशासनाचे लक्ष दयावे.नंतर हे करता येईल. १०० रू. बचत गटांनी भरणा केले नाही तर काय करणार आहे.

श्री.अ.रशिद खॉन : जेथे महापालिकेचा फायदा होणार नाही अशा योजना का आणत आहे शहरात पाणी टंचाई आहे त्याकडे लक्ष दयावे. या शहरात १०० टॅक्सी कंपनीच्या चालू आहे यास कोण घेणार आहे.

श्री.नरवडे वसंत : या शहरात लोकल टॅक्सी जशी मुंबईला चालते तशी चार सीटची मीटर टाकून चालू करावी.बचतगटांना त्यांचे नजरेसमोर काय व्यवसाय चालतो यावर लक्ष

राहील याची परवानगी आरटीओ कडून घ्यावी. काळी पिवळी लोकल टॅक्सी या सिटीमध्ये सुरू करावी, जेणे करून लक्षात येईल महाराष्ट्राचे परमीट घेवून शहराच्या बाहेर गाडी गेल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार याचा विचार करावा.

श्री.संजय जोशी : दोन्ही ठराव रद्द करावे.

श्री. दत्ताभाऊ पाध्रीकर : बचतगटांना मदत करायची असेल तर झाडू व महापालिकेला जे जे साहित्य लागते ते खरेदी करून बचत गटांना काम द्यावे. तरच बचत गटांना जीवदान मिळेल. टॅक्सीमूळे बचत गटात सुधारण होणार नाही. हे स्थगित करावे.

श्री.वसंत नरवडे : रद्द करावे. यात कुणी अभ्यासू नसेल तर असे प्रस्ताव पुन्हा पुन्हा येवू नये.

श्री.संजय जोशी : टॅक्सीचा धंदा करू द्या. GPRS नाही, कॉल सेंटर नाही.

मा.सभापती : सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर अधिकारी सक्षम खुलासा करू शकत नाही टॅक्सी घेतल्या स्थायी समितीने मंजूरी दिली नाही. ती या सभागृहाची जबाबदारी नाही. विषय क्र.२१ व २२ रद्द करण्यात येते.

ठराव :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 22 :

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिका औरंगाबाद महिला व बालकल्याण विकास समिती, औरंगाबाद ह्यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या ए.सी. टॅक्सी कार चा प्रकल्प लवकरच सुरू करीत आहे. दिनांक 1 मे 2008 रोजी 3 टॅक्सीज मारूती वर्सा ही वाहने प्राप्त झाली असुन त्याचे उद्घाटन पार पडले आहे.

ह्या टॅक्सीजवर CPRS System बसविणे अनिवार्य असुन त्यामुळे टॅक्सीचे Location कॉल सेंटर/कार्यालयात बसुन लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर पाहता येईल. यासाठी ब्रॉडबँडचे कनेक्शन मनपास घ्यावे लागेल.

टॅक्सीजवर CPRS System बसविण्यासाठी दरपत्रके मॅन्युफॅक्चरींग कंपन्याकडुन मागविली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

Sr.No.	Perticulers	The Agency Offering rates	
		M/s.Qdent, Mumbai Rs.	M/s.Transtrite Telematices Pvt.Ltd. Rs.
1.	GPS tracking System Inclusive of all taxex.	22,000.00 +12.5%Vat 2750.00	21,000.00 Inclusive of12.5%Vat
		24,750.00	**21,000.00**
2.	Installation charges at Aurangabad(One time only)	**500.00**	**500.00**
		Total - 25,250.00	**Total - 21,500.00**
3.	Hosting of the system per taxi/month	**500.00**	**500.00**
4.	Sim card having GPRS activation	**199.00**	**199.00**

तुलनात्मकदृष्ट्या **M/s.Transtrite Telematices Pvt.Ltd. Mumbai** ह्यांचे दर कमी दराचे असुन रूपये 21,000/- असे आहेत. व इन्स्टॉलेशन चार्जेस रू.500/- प्रति युनिट, सॅटलाईटवरून सदरील यंत्रणेची लिंक मनपाच्या कॉल सेंटर तसेच मनपा कार्यालया पर्यंत देण्याच्या कामाची प्रति वाहन प्रति महिना रूपये 500/- खर्च द्यावा लागेल. ॲक्टीव्हेशनसाठी प्रतयेक वाहनावर रूपये 199/- प्रति

सिमकार्ड/प्रति महिना/प्रति वाहन असे त्यांचे दर आहेत. ए.एम.सी. कॅब टॅक्सीजवर ही सिस्टीम महिला बचत ग्रुप तर्फे बसविण्यात येत आहे.

मनपा मध्ये महत्वाची वाहने जसे वॉटरटँकर्स, जेटींग मशीन, व्हॅक्युम मशिन्स, फायर वाहने व इतरही वाहने ह्या सर्वांवर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने ही जी.पी.आर.एस. सिस्टीम बसविल्यास वाहनचालकांवर व वाहनाच्या वापरावर नियंत्रण राहील.

तरी वर दर्शविल्या प्रमाणे **M/s.Transtrite Telematices Pvt.Ltd. Mumbai** ह्यांचे आलेल्या कमी दराचे दरपत्रकास मंजुरी मिळावी. म्हणजे त्यांचेशी वार्षिक करार करण्यात येईल व ह्याच मंजुर दराने जरूरी प्रमाणे मनपाच्या विविध वाहनांवर **GPRS System** बसविता येईल.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

ठराव :

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. 23 :

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या हद्दीत अनेक शासकीय, खाजगी, वैद्यकीय/निमवैद्यकीय/नर्सिंग संस्था वेगवेगळे प्रशिक्षण देत आहेत. या खाजगी संसथांनी महानगरपालिकेकडे त्यांच्या प्रशिक्षणार्थींना महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रे/रूग्णालये यांचा प्रशिक्षण कालावधीत उपयोग करण्यासाठी वारंवार विनंती करीत आहे. या संदर्भात मा.महासंचालक, आरोगय सेवा, मुंबई यांचे निदेश No.DHS/Reegulation/Trg/2000 D-3 B, Office of the Director of Health Services, Mumbai, Date 19.7.2000 नुसार या प्रशिक्षणार्थींना महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचा उपयोग करून घेण्यासाठी खालील प्रमाणे फीस आकारून व महानगरपालिकेने ठरविलेल्या अटी व शर्तीनुसार उपलब्ध करून देता येईल.

1. फक्त महाराष्ट्र शासनमान्य किंवा स्थानिक कॉन्सील संस्थांच्या प्रशिक्षणार्थींनाच याबाबत परवानगी देण्यात येईल.
2. प्रशिक्षणार्थींची संख्या 5 खाटांसाठी 2 अशी असेल.
3. यासाठी खालील प्रमाणे फीस आकारण्यात येईल. ही फीस प्रति माह/प्रति प्रशिक्षणार्थी खालील प्रमाणे असेल.

	शासनाचे दर	मनपाचे प्रस्तावित दर
पदव्युत्तर/पदवी, पदवीका/हाऊस जॉबसाठी	रू.500/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी	रू.**600**/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी
इंटर्नस	रू.300/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी	रू.**400**/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी
पदवीपुर्व प्रशिक्षणार्थी जे एमबीबीएस/बीडीएस करीत आहेत त्यांच्यासाठी	रू.300/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी	रू.**400**/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी
इतर प्रशिक्षणार्थी किंवा विद्यार्थी उदा. नर्सिंग साठी	रू.200/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी	रू.**300**/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी

4. महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रे/रूग्णालये मध्ये प्रशिक्षण घेतांना या प्रशिक्षणार्थींच्या कुठल्याही बेजबाबदार वर्तनास किंवा रूग्णांच्या बाबतीत निर्माण झालेल्या कुठल्याही गुंतागुंतीस किंवा रूग्णांच्या बाबतीत झालेले दुर्लक्ष किंवा इतर कोणत्याही बाबींसाठी पाल संस्था जबाबदार राहील व यासाठी पाल संस्थेतर्फे बाँड लिहून घेतला जाईल.
5. पालक संस्थेस महानगरपालिके बरोबर कायदेशीर करारनामा करावा लागेल व हा करारनामा दरवर्षी नुतनीकरण करून घेणे बंधनकारक राहील.

6. पाल संस्थेस प्रशिक्षणार्थींची वर्षभराची फीस ॲडव्हान्समध्येच भरावी लागेल. त्यानंतरच महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रे/रूग्णालये येथे प्रवेश मिळेल.
7. प्रशिक्षणाबाबतचे कुठलेही निर्णय घेण्याचे अधिकार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना राहतील.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील वेगवेगळे आरोग्यविषयक प्रशिक्षण देणाऱ्या शासकीय, खाजगी, वैद्यकीय/निमवैद्यकीय/नर्सिंग संस्था या खाजगी संस्थांनी विनंती केल्यानुसार प्रशिक्षण कालावधीत त्यांच्या प्रशिक्षणार्थींना महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचा उपयोग करून घेण्यासाठी खालील प्रमाणे फीस आकारून व महानगरपालिकेने ठरविलेल्या अटी व शर्तीनुसार उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते.

	मनपाचे दर
पदव्युत्तर/पदवी, पदवीका/हाऊस जॉबसाठी	रू.**600**/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी
इंटर्नस	रू.**400**/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी
पदवीपुर्व प्रशिक्षणार्थी जे एमबीबीएस/बीडीएस करीत आहेत त्यांच्यासाठी	रू.**400**/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी
इतर प्रशिक्षणार्थी किंवा विद्यार्थी उदा. नर्सिंग साठी	रू.**300**/- प्रति माह प्रति प्रशिक्षणार्थी

वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 24 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.62 भाग्यनगर येथील विवेकानंद चौक ते भाग्यनगर रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,97,000/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील कामासाठी फेरनिविदा पत्रके मागविली असता एकूण दोन निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

1. के. बी. पाथ्रीकर — 32.21% जास्त दराने
2. चंद्रम्मा आशन्ना — 37.00% जास्त दराने

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी के.बी. पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32.21% ने जास्त आहेत. डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेऊन 19% जास्त दराने काम करण्यास मंजुरी प्राप्त झालेली असून सदर काम 19% जास्त दराने केल्यास सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा जास्त म्हणजेच रक्कम रू.11,85,973/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी के. बी. पाथ्रीकर यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.62 भाग्यनगर येथील विवेकानंद चौक ते भाग्यनगर रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक के.बी. पाथ्रीकर यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

: ऐनवेळचे विषय :

विषय क्र. 25 :

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, रामतारा कॉलनी, ज्ञानेश्वरनगर, मित्रविहार कॉलनी व उल्कानगरी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाची

अंदाजपत्रकीय रक्कम रू.13,96,738/- इतकी असुन या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा विक्री झाल्या होत्या, निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या असुन त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

1.	ए. एस. कन्स्ट्रक्शन	29.29% जास्त दराने
2.	एम. ए. सिद्दीकी	35.00% जास्त दराने
3.	मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन	35.35% जास्त दराने
4.	आदीनाथ कन्स्ट्रक्शन	38.38% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे असून निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.9% जास्त असुन निविदेतील दराबाबत विचार विनिमय होऊन सदरील काम 23.34% जास्त दराने करण्यासाठी मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची मान्यता झाली आहे. करीता सदरील काम 23.34% जास्त दराने मान्यता होण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.रविकांत गवळी : विकास कामाचा विषय आहे मान्य करण्यास हरकत नाही परंतू के.बी. पाथ्रीकर किंवा ए.एस. कन्स्ट्रक्शन असेल यांनी अनेक कामे घेतलेली आहे श्री. पाथ्रीकर यांनी सहा महिण्यापासून २% रक्कम भरणा करून वर्क ऑर्डर घेतली अद्याप काम सुरू केले नाही.

श्री.जावेद हसन खॉन : वर्कऑर्डर घेतल्यानंतरही काम का होत नाही.

अति.शहर अभियंता : एक महिण्यापासून मुंबई येथील एसपीएल रिफायनरी जेथून डांबर मिळते ते बंद आहे. गाडी गेल्यानंतर ती येण्यास एक महिणा लागतो. शहरात जवळपास एक महिण्यापासून डांबरीकरणाची कामे बंद आहे. संचिका बघून स. सदस्यांना माहिती दिली जाईल.

श्री.रविकांत गवळी : वर्क ऑर्डर होवून चार महिणे झाले एक महिण्यापासून काम बंद आहे त्यावेळी तो विषय नव्हता. खडीकरणाचे कामाचे वर्क ऑर्डर होवून चार महिणे झाले काम होत नाही ज्यांचेकडे पैसे नव्हते त्यांनी कामे घ्यायला नको होते. कामे लवकर सुरू होण्यासाठी आजच ठोस निर्णय घ्यावा.

श्री.संजय जोशी : बी-१ टेंडरची लिमीट असते सहा महिणे झाले असतील तर त्या ठेकेदारास काळया यादीत समावेश करावा.

श्री.रविकांत गवळी : माझे वार्डात २ लक्ष पासून ते १० लक्षपर्यतची सहा कामे असून एकाच एजन्सीने घेतले काम घेतांना २०/२५% बिलोने घेतले त्या कामासाठी २-१२-२००७ रोजी वर्कऑर्डर दिली त्यांची मुदत १३-३-२००८ रोजी पर्यत होती त्यानंतर अडीच महिणे उशीर झाला. पेव्हर ब्लॉकचे काम आहे. संबधीतावर काय कार्यवाही केली.

अति.शहर अभियंता : स.सदस्य यांचे वार्डात चार कामे पेव्हरब्लॉकची कामे असून साईटवर आलेले पेव्हरब्लॉक निष्कृष्ट दर्जाचे असल्याने काम बंद केले. त्यानंतर त्यांनी कामच केले नाही शेवटीची नोटीस दिली २० तारखेपर्यत काम सुरू केले नाही तर ज्या बी-१ च्या अटी शर्तीआहे त्यानूसार कार्यवाही केली जाईल.

श्री.रविकांत गवळी : मार्च ते मे महिण्यापर्यंत का कार्यवाही केली नाही.आजपर्यत संबधीत ठेकेदारास नोटीस सुध्दा दिली नाही ६-६ महिण्यापूर्वी वर्कऑर्डर झाल्या कामे सुरू झाली नाही.

मा.सभापती : २० तारखेपर्यत संबधीत ठेकेदाराने काम सुरू केले नाही तर त्यांना काळया यादीत समावेश करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : संपूर्ण शहराच्या संदर्भात चर्चा करावी.

श्री.रविकांत गवळी : माझे वार्डात दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत शासनाकडून निधी आला ते सुध्दा काम होत नाही.

श्री.वसंत नरवडे : शहरात विविध कामे बंद आहे.उपलब्ध निधी व स्पील मध्ये गेलेली कामे याचा ताळमेळ घातलेला नाही. स्थायी समितीचे १६सदस्य विकास कामासाठी मागे लागणार त्यांना पहिल्यांदा प्राधान्य जो चालवितो त्यांचे बरोबर चालणारी ही महापालिकेची सिस्टीम आहे. हे बरोबर नाही. डांबरीकरणाची कामे बंद असतील परंतू इतर कामे बंद आहे व स्पील ओव्हरमध्ये का गेली याचा कुणीच विचार केला नाही. १०० कोटी स्पील ओव्हरची कामे असून १०-१५ कोटी बिले देणे आहे किती रक्कम आज रोजी तिजोरीत आहे, याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. येणारा निधी किती याचा विचार केला पाहिजे बजेट फुगवून फायदा नाही. २००८-०९ मधील बजेटमधील एक ही काम होणार नाही अशी परीस्थिती आहे २००६-०७ व २००७-०८ मधील स्पील ओव्हरचीच कामे आतापर्यत चालू आहे. जे काम होईल ते करून घ्यावे. झालेल्या कामाचे बिल द्यावे ते ठेकेदार काम करतील.

श्री.संजय जोशी : पाच कोटीत कचरा उचलून घेणे ३०-३० कोटीची रस्त्याची कामे करू नये मागणी केली मान्य केली नाही त्यामूळे ही परीस्थिती निर्माण झाली. प्रशासनाने वसूली करावी त्यावर एक स्वतंत्र बैठक आयोजित करावी.

श्री.वसंत नरवडे : डांबरीकरणाची कामे करण्याचे आदेशीत करावे.

मा.सभापती : हा विषय मंजूर करण्यात येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रामतारा कॉलनी, ज्ञानेश्वरनगर, मित्रविहार कॉलनी व उल्कानगरी अंतर्गत रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23.34% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 26 :

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, BUILDING E-FLOOR INCLUDING DATA CENTER FOR AURANGABAD MUNICIPAL CORPORATION, AURANGABAD या कामासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता प्रथम निविदा सुचनेस प्रतिसाद मिळाला नाही, म्हणुन दुसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या असता एक निविदा विक्री झाली व कंत्राटदार गोसावी एस.के. यांची एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त दरांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

तपशील	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त निविदेनुसार रक्कम
Total of Schedule-I (Interior works for DATA Centre, E-tendering & Auto-DCR room)	21,01,960.00	23,45,580.00
Total of Schedule-II (Interior works for DATA Centre, E-tendering & Auto-DCR room)	15,61,125.00	15,56,050.00
Total of Schedule- **I + II**	**36,63,085.00**	**39,01,630.00**

प्राप्त दरांची अंदाजपत्रकीय दरांशी तुलना केली असता प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.51% अधिक येतात. करीता कंत्राटदारास वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. वाटाघाटी अंती कंत्राटदार श्री.गोसावी एस. के. अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.51% अधिकच्या दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. व या दरास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे BUILDING E-FLOOR INCLUDING DATA CENTER FOR AURANGABAD MUNICIPAL CORPORATION, AURANGABAD या कामासाठी प्राप्त निविदानुसार सदरील काम श्री. गोसावी एस. के. यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.51% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 27 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, बांधकाम विभाग 2 अंतर्गत मुख्य रस्त्याचे डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,94,700/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण 4 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले होते.

1.	राजेंद्रसिंग अजितसिंग	14.5% जास्त दराने
2.	मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन	19.00% जास्त दराने
3.	ए. एस. कन्स्ट्रक्शन	30.00% जास्त दराने
4.	आदीनाथ कन्स्ट्रक्शन	30.1% जास्त दराने

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी राजेंद्रसिंग अजितसिंग यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.5% ने जास्त आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी राजेंद्रसिंग अजितसिंग यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.5% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बांधकाम विभाग 2 अंतर्गत मुख्य रस्त्याचे डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक राजेंद्रसिंग अजितसिंग यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 28 :

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांची डांबरीकरणाद्वारे पॅचवर्क/दुरूस्ती करणे या कामासाठी रक्कम रू.19,95,628/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाचे निविदापत्रके मागविले असता एकूण 6 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 5 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले होते.

1.	चारणीया कन्स्ट्रक्शन	25.00% जास्त दराने
2.	मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन	26.01% जास्त दराने
3.	एम. ए. सिद्दीकी	26.86% जास्त दराने
4.	आदीनाथ कन्स्ट्रक्शन	30.1% जास्त दराने
5.	ए. एस. कन्स्ट्रक्शन	35.00% जास्त दराने

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी चारणीया कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 25% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 14.5% जास्त दर येत आहे. त्यामुळे सदरील कामावर रक्कम रू.22,84,994/- एवढा खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी चारणीया कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.5% जास्त दराने काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांची डांबरीकरणाद्वारे पॅचवर्क/दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक चारणीया कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्री.अ.रशिद खान मामू : घनकचरा संदर्भात टेंडर काढले शासनाने रद्द केले पून्हा टेंडर काढणार काय खूलासा घ्यावा.

अति.शहर अभियंता : शासनाकडून आलेल्या पत्रात असे आहे की मुळ निविदेतील अट बदलली असल्यामूळे फेरनिविदा केलेल्याची निविदा डॉक्युमेंट महाराष्ट्र शासनाकडे पाठवावे शासनाकडे ते पाठविले प्राप्तही झाले.

श्री.संजय जोशी : सभागृहाने मंजूरी ७ वर्षासाठी दिली ठेका १० वर्षासाठी दिला गाडया गुत्तेदारास देण्याचे ठरले. हेच कागदपत्रे आहेत.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : आजची परीस्थिती काय एवढाच खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : संबधीत ठेकेदाराशी महापालिकेने करारनामा केलेला नाही.

श्री.अ.रशीद खान मामू :रिकॉल करण्यात यावे. शासनाची स्थगिती आहे का?

श्री.वसंत नरवडे : शासनाचे पत्र वाचून दाखवावे.

श्री.रविकांत गवळी : पुढील बैठकीत यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.अ.रशीद खान : शहानुरवाडी भागात महापालिकेच्या जागेवर श्री. नागपाल यांनी अतिक्रमण केले, इमारत बांधली. २००२ ला तोडण्याचे पत्र महापालिकेला आहे. परंतू देवून घेवून ती इमारत पाडली नाही.

उपआयुक्त (म) : या संबधी माहिती घेवून पूढील बैठकीत दिली जाईल.

श्री.अ.रशीद खान : लिगल माहिती प्रमाणे ते तोडावे नगररचना विभागाकडून पुन्हा जागेची मोजणी व्हावी पुढील कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी : नगररचना विभागाचे कुणीच अधिकारी सभेला नसतात उपअभियंता येवू शकत नाही का?

उपआयुक्त(म.) : प्रशासकीय अधिकारी रजेवर असून पत्र आल्याची माहिती नाही संचिका बघून पूढील कार्यवाही होईल.

सौ.मोमीन सफिया : अन्नधान्य भेसळ परवानासाठी कोणत्या कागदपत्राची गरज असते. जबाबदारी कुणावर असते.

श्री.अ.रशीद खान : अनेक हॉटल्सना एनओसी घेतलेली नाही, रीनीवल नाही, महापालिकेचे जवळपास ८० लक्षचे नुकसान झालेले आहे.

आरोग्य वैद्य. अधि. : मालमत्ता पाणीपटटी कर बेबाकी देणे, जागेचा नकाशा, व्यवसाय कोणता, भागीदार, तसे मशीनरीची यादी उत्पादन तसेच कामगाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र ई. कागदपत्रे लागतात.

श्री.अ.रशिद खान : एवढे कागदपत्रांची पुर्तता करीत नसेल तर जबाबदार कोण त्याबाबतीत काय ॲक्शन घेतली जाते.

आरोग्य वैद्य.अधि. : अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असते.

श्री.अ.रशिद खान : अग्निशमन विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही तर दुकान चालूच असते महापालिकेचे नुकसान होत यास जबाबदार कोण वेळीच का कार्यवाही केली जात नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : किती अर्ज प्रलंबीत आहे. महापालिकेचे नुकसान होत आहे हॉटेल चालू की बंद. हॉटेल चालू असेल तर लायसन्स दिले जात नाही, दिलेले रिनीवल केले जात नाही. महापालिकेला येणारा महसूल येत नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

आरोग्य वैद्य. अधि. : एकूण ९०८६ अर्ज त्यातील २०७१ लोकांना ना हरकत प्रमाणपत्र दिले उर्वरीत ६११५ लोकांना दिले नाही नियमाने बांधील केले आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : नियमबाहय कुणालाही देवू नये. बेकायदेशीर कुणाचा व्यवसाय चालवू नये.

आरोग्य वैद्य. अधि. : नियमबाहय कुणाचा व्यवसाय चालत असेल तर त्या बाबतीत ॲक्शन घेतली जाईल.

श्री.रविकांत गवळी : तीन वर्षात महापालिकेला यापासून किती महसूल जमा झालेला आहे.

आरोग्य वैद्य.अधि. : १-४-२००७ ते ३१-३-२००८ पर्यत ६७३ व्यावसायिकानां परवानगी होती वसूलीचे उद्यिष्ठ १०.००लक्ष पैकी ९.६४लक्ष वसूल झाले त्यानंतर २०७१ लोकांना परवानगी दिली.

श्री.रविकांत गवळी : याचा अर्थ ६००० लोक अवैध रितीने व्यवसाय करतात. त्यापासून एक वर्षाला २७ लक्ष तर तीन वर्षात येणारे ९० लक्ष उत्पन्न आले नाही. नुकसान झाले. इतरही अनेक प्रकरणात महापालिकेला कोटयावधीचे नुकसान झालेले असेल. जे जबाबदार असेल त्यांचेवर जबाबदारी फिक्स करावी.

श्री.अ.रशीद खान : नाशिक , पुणे महापालिकेचे जशी एनओसी दिली जाते त्याप्रमाणे येथे दयावी. जेणे करून महापालिकेला मोठा महसूल जमा होवू शकतो.

मा.सभापती : स.सदस्यांनी केलेल्या सुचनाची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री.कटकटे सतीश : शहरात किती ठिकाणी सौदर्यीकरणाची कामे चालू आहे.

अति.शहर अभियंता : शहरात ६ मुख्य चौकात पेव्हर ब्लॉक बसविण्याची कामे चालू आहे. मागिल महिण्यात मटेरीयल मागविले आहे. त्यात आझाद चौक, पंचवटी चौक, काम चालू असून १३०० ब्रास मटेरियल प्राप्त झाले त्यांचे बील अदा केले ८० लक्ष हे आर.ए. बिल दिले.

श्री.रविकांत गवळी : ज्या ठेकेदारांनी १०० टक्के काम केल`त्यांना बील दिले नाही ज्यांचे काम चालू आहे त्यांना ॲडव्हान्समध्ये बील दिले हे योग्य नाही.

अति.शहर अभियंता : मटेरियल आलेले आहे. एकूण मटेरियलचे ७५ टक्के बिल दिले.

सौ.मोमीन सफिया : टॅक्स पावती नाही किती अन्न भेसळ परवाने दिले किती देणे बाकी आहे महापालिकेकडे अन्न भेसळ तपासणीसाठी कर्मचारी नाही.

आरोग्य वैद्य. अधि : आजच त्या पदावर कर्मचारी नियुक्त केले तपासणी करण्यासाठीच त्यांची नियुक्ती दिली जाईल.

मा.सभापती : घनकचरा संदर्भात शासनाचे काय आदेश आलेले आहे वाचून दाखवावे.

अति.शहर अभियंता : ७ मे २००८ रोजी शासनाकडून आलेल्या पत्रात असे आहे की मुळ निविदेतील अट बदलली असल्यामूळे फेरनिविदा केल्याची निविदा डाकूमेंन्ट महाराष्ट्र शासनाकडे पाठवावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : फेरनिविदा म्हणजे पुन्हा निविदा काढावी असा अर्थ निघतो.

मा.सभापती : ७ मे २००८ रोजी घनकचरा संदर्भात शासनाचे जे पत्र आले आहे त्या बाबतीत पुन्हा फेरनिविदा काढून स्थायी समितीकडे ठेवावी.

अति. शहर अभि. : इंडेम्नीटी बॉन्ड दिलेला असतो. ७५% पेमेंट मटेरीयलच्या अगेन्स्ट देता येते. B-१ क्लॉज प्रमाणे देता येते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : पेव्हरब्लॉकसाठीच ॲडव्हॉन्स का द्यावे इतर कामासाठी का दिले जात नाही.

श्री .सतीश कटकटे : ६-६ महिण्यापासून काम होवूनही काही ठेकेदाराचे बिल अदा केले नाही पेव्हर ब्लॉकसाठी ॲडव्हांन्स पेमेन्ट देण्याची गरज होती का?

श्री.रविकांत गवळी : ७५ टक्के म्हणजे एक कोटीचे मटेरियल आले का?

श्री.सतीश कटकटे : मेटेरियल कुठे आहे बरोबर आहेका यांची पाहणी करावी.

मा.सभापती : १-४-२००७ ते ३१-३-२००८ पर्यत पेव्हर ब्लॉकचे किती पेमेन्ट दिले आहे.

अति.शहर अभियंता : बी-१ टेंडर खाली जे काम आहे त्यांना दिलेले आहे. मटेरियल आलेले आहे. पुढील बैठकीत सविस्तर माहिती दिली जाईल.

श्री.अ.रशिद खान : जुन्या शहराला पुरेसे पाणी मिळत नाही. एक दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय कुणी घेतला.

मा.सभापती : सर्व पदाधिकारी व प्रशासनाने मिळून पावसाळयापर्यत एक दिवसा आड पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे.

श्री.अ.रशीद खान : सदस्यांना बोलविले असते तर आम्ही योग्य त्या सुचना केल्या असल्या परंतू तसे झाले नाही १५ मिनिटे पाणी दिले जाते काही लोक विद्युत मोटार लावतात. त्यामूळे इतरांना पाणीच मिळत नाही.

श्री.वसंत नरवडे : शहराला एक दिवसा आड पाणी दिले जाते नेहमीच पाईपलाईन फुटते काम झ ाल्यानंतर त्या भागात फिरले पाहिजे २-४ मजली इमारतीवर पाणी जात नाही लाईट नसते त्या लोकांना पाणी मिळत नाही सर्वांना पाणी वाटप होईल याची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी.

श्री.अ.रशीद खान : गरीब लोकांकडे पाणी साठविण्यासाठी काहीही नसते जास्त वेळ पाणी दयावे क्रांतीचौक मध्ये मोठमोठे हॉटेल आहे त्यांना पाणी दररोज मिळते त्यांनाही एक दिवसा आड अर्धातास पाणी करावे प्रेशरने पाणी दयावे यासाठी पॉलीसी ठरवावी योग्य नियोजन करून पाण्याची वेळ वाढवावी

श्री.वसंत नरवडे : ४५ मिनिटापेक्षा जास्त वेळ पाणी दयावे पाणी सोडल्यानंतर विज वितरणात बदल व्हावा यासाठी या शहरातील स्थानिक लोकप्रतिनिधी व संबधीत मंत्री महोदय यांचेशी पक्षाचे राजकारण न करता सर्वानीमिळून चर्चा करावी

श्री.संजय जोशी : मा.सभापती कॉग्रेस पक्षाचे आहे शासन दरबारी कॉग्रेसची सत्ता असून पॅरलल लाईन आणण्या बाबत त्यांनी शासनाकडे प्रयत्न करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : या शहराला पाणी देण्याच्या संदर्भात कुणी राजकारण करू नये आता एक दिवसा आड सर्वच शहरास पाणी केले परंतु गेल्या अनेक वर्षापासून सिडको हडकोला एक दिवसा आड पाणी मिळते. गोरगरीब वस्तीत व इतर सर्वांना पाणी मिळावे एवढी काळजी घ्यावी.

श्रीमती मोमीन सफिया : माझे वार्डात ८-१० दिवसापासून दोन दिवसाआड पाणी येते बाजूच्या वार्डात दररोज पाणी येते एकाच टाकीवरून पाणी दिले एक वार्डासाठी एक न्याय दुसऱ्यासाठी वेगळा न्याय हे बरोबर नाही.

कार्य.अभियंता(पापू) : एक दिवसा आड पाणी देण्याचा निर्णय घेतल्यानंतरही आजही काही वार्डात कमी जास्त किंवा काहीकडे दररोज पाणी मिळते हे सर्व सुरळीत झाल्यानंतर पाणी वाटपात वेळ वाढवून देवू शकतो. अमरप्रित हॉटेल जवळ जलवाहिनी फुटल्याने दुरूस्तीसाठी १० तास लागले. तसेच नक्षत्रवाडी पुन्हा पाईपलाईन फुटली होती दुरूस्तीचे काम पुर्ण झाल्यावर पूर्णपणे पाणी मिळेल ज्यांनी बोरींग केले त्यांचेवर कालच पोलीस केस केली.

श्री.अ.रशिद खान :आजही काही ठिकाणी दररोज पाणी तर काही ठिकाणी एक दिवसा आड व ते पुरेसे नाही कधी वेळ वाढविणार आहे.

श्री.सतीश कटकटे : अमरप्रित हॉटेल जवळ लाईन फुटली अनेक लोकांच्या घरात पाणी गेले मोठे नुकसान झाले त्यांना आर्थीक मदत देणार का?

श्री.अ.रशिद खान : पैठणरोडवर ज्यांना आर्थीक मदत केली, त्याप्रमाणे इतर कुणी असेल त्यांनाही द्यावी.

मा.सभापती : मदत देता येत असेल तर तशी कार्यवाही करावी पुर्वी सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने दिलेले आहे.

श्री.संजय जोशी : ही बाब मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणून दयावी पंचनामा केला असेल तर रिपोर्ट मागवावा.

श्री.वसंत नरवडे : उद्याच पंचनामा करण्याचे आदेशीत करावे महापालिकेच्या लाईनने नुकसान झाले असेल तर मदत करण्यात हरकत नसावी.

मा.सभापती : प्रशासनाने आर्थीक मदत देण्या संदर्भात नियमानुसार कार्यवाही करावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

स्थायी समिती सभा

कार्यक्रम पत्रिका क्रमांक (०४)

दिनांक :- १२/०५/२००८

सूचना

मंगळवार, दिनांक १३/५/२००८ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता त्याच दिवशी **दुपारी ४.३० वाजता** 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.०४) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सभेच्या वेळेतील बदल लक्षात घ्यावा व या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद